पलूस शिक्षण प्रसारक मंडळाचे,

# कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पलूस जि.सांगली

---

# वार्षिक अहवाल सन 2021—2022

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पलूस या महाविद्यालयाचा सन 2021—22 या शैक्षणिक वर्षाचा अहवाल आपणापुढे सादर करीत आहे. महाविद्यालयाची स्थापना 1992 मध्ये झाली. महाविद्यालयाने स्थापनेपासून ग्रामीण भागातील विद्यार्थी घडविण्याकरिता सातत्याने प्रयत्न करून संख्यात्मक व गुणात्मक वाढीचा आलेख सतत वाढत ठेवला आहे. महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान बीबीए, बीसीए, बीसीएस, पीजीडीसीए या शाखाही कार्यरत आहेत. तसेच एम.ए.(इंग्रजी, अर्थशास्त्र), एम.कॉम.(अकौन्टसी) एम.एस्सी. (संगणकशास्त्र, प्राणीशास्त्र) हे पदव्युत्तर अभ्यासक्रम महाविद्यालयामध्ये सुरू आहेत. शिवाजी विद्यापीठाचे दूरशिक्षण केंद तसेच कंपनी सेक्रेटरी हा कोर्स सुरू आहे. त्याचप्रमाणे यु.जी.सी. अनुदानाअंतर्गत 1) पीक संरक्षण 2)रेशीम उद्योग 3) घरगुती विद्युत उपरकणे दुरूस्ती 4) स्पोकन इंग्लिश 5). योगा ॲण्ड मिडीटेशन 6). टॅक्स प्रोसेजर 7). कॉम्प्यूटर हार्डवेअर ॲण्ड मेन्टेनस हे करिअर ओरिएटेड कोर्स सुरू आहेत.

सन 2021—22 या शैक्षणिक वर्षामध्ये एकूण **1754** विद्यार्थी शिक्षण घेत आहेत (त्यापैकी अनुदानित पदवीवर्गामध्ये मध्ये **1220** विनाअनुदानित पदवीवर्गामध्ये मध्ये **318** व पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये 216 विद्यार्थी आहेत. दूरशिक्षण केंद्राअंतर्गत 30 विद्यार्थी प्रवेशित आहेत. त्याकरिता महाविद्यालयामध्ये 71 शिक्षक व 22 प्रशासकीय सेवक कार्यरत आहेत.

**<u>या शैक्षणिक वर्षातील उल्लेखनीय बाबी म्हणजे</u>**

1. महाविद्यालयातील खालील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांना उल्लेखनीय कार्याबददल गौरविण्यात आले आहे.
    a. महाविद्यालयातील रसायनशास्त्र विषयाचे सहा. प्राध्यापक डॉ. यु. पी. पाटील यांना शिवाजी विद्यापीठाकडून पीएच डी पदवी प्रदान करण्यात आली आहे.
    b. डॉ. सत्यवान सुबराव पाटील, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख यांना International Scientist Awards on Engineering Science and Medicine, Vishakapattanam, tamilnadu. यांचेकडून Best Researcer Award, बहाल करण्यात आला आहे.
    c. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य यांचे "व्यवस्थापन शास्त्राचे मानकरी" या पुस्तकाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डी.टी. शिर्के, प्र—कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, प्र.कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे झाले.

d. या शैक्षणिक वर्षात इंग्रजी विभागाचे प्रमुख व आयक्युएसी समन्वयक डॉ. पी.एम. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तीन पीएच.डी. व 1 एम.फील. पदवी विद्यार्थ्यांनी प्राप्त केली आहे. एकूण 7 पीएच.डी. व 1 एम.फील पदव्या त्यांचे मार्गदर्शनाने प्राप्त केली आहे.

e. श्री. जयंतराव जयसिंगराव कदम यांना शिवाजी विद्यापीठ आदर्श प्रशासकीय सेवक पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

f. महाविद्यालयातील डॉ. उल्हास महादेव माळकर, डॉ. शेषभरे सुधीर यशवंत, डॉ. कुंभार सुरेश मल्लाप्पा यांना प्रोफेसर पदी बढती मिळालेली आहे.

2. शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती– सन 2020–21

महाविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी सदरची गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे.

1. जाधव सुचेता तानाजी बी.ए. भाग– 1 – रू.5000
2. सूर्यवंशी अक्षता अशोक बी.ए. भाग– 1 – रू.5000
3. घारे वैशाली वसंत बी.सी. एस. भाग– 3 – रू.10000

3. शिवाजी विद्यापीठ मार्च – 2021 परीक्षेमध्ये खालील विद्यार्थ्याचे यश संपादन केले आहे

1. बी.एस्सी. –कु. लाड हर्षदा विकास बी.एस्सी मध्ये – शिवाजी विद्यापीठामध्ये प्रथम कमांक
2. एम.एस्सी प्राणीशास्त्र – कु. यादव कविता उत्तम – शिवाजी विद्यापीठामध्ये प्रथम कमांक
3. पीजीडीसीए – कु. मोहिते श्रुती राजेंद्र – शिवाजी विद्यापीठामध्ये प्रथम कमांक, कु. घाडगे निकिता सुरेश – शिवाजी विद्यापीठामध्ये द्वितीय कमांक, कु. स्वामी प्रियांका अरूण – शिवाजी विद्यापीठामध्ये तृतीय कमांक, कु. पाटील एश्वर्या प्रविण – शिवाजी विद्यापीठामध्ये3रा कमांक, कु. पुरके प्रणाली मारूती – शिवाजी विद्यापीठामध्ये 5वा कमांक

4. दिनांक 26 जानेवारी 2022 रोजी आपल्या संस्थेस Quality Managesment system अंतर्गत ISO- 9001-2015 चे सर्टिफिकेट प्राप्त झाले आहे.

5. Government of India, Ministry of Sciecnce and Technology, Department of Biotechnology अंतर्गत DBT star College या योजनेतून 44 लाख प्राणीशास्त्रव भौतिकशास्त्र विभगाकरिता संशोधनासाठी मंजूर झाले असून या वर्षामध्ये त्यामधील 28 लाख अनुदान विनियोग केला आहे.

6. डॉ. पंतगराव कदम महाविद्यालय सांगलवाडी येथे पार पडलेल्या जिल्हा स्तरीय युवा महोत्सवामध्ये खालीलप्रमाणे विविध प्रकारामध्ये यश संपादन केले आहे. समुहगीत – प्रथम कमांक – 10 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. मराठी वक्तृत्व – श्री अभिजित कोळी बी.ए. भाग– 2 – तृतीय कमांक सुगम गायन – श्री स्वप्नील रमेश कोकळे बी.सी.ए. भाग– 1 – तृतीय कमांक

7. संत गजानान महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय महागाव ता. गडहिंग्लज येथे पार पडलेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये खालील यश संपादन केले आहे.

a. सुगम गायन – श्री स्वप्नील रमेश कोकळे भाग– 2 – तृतीय कमांक

8. आखील भारतीय विद्यार्थी साहित्य संमेलन सांगली येथे संपन्न झाला यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाटय (10 विद्यार्थी )या स्पर्धेत तृतीय कमांक मिळाला आहे.

9. शिवाजी विद्यापीठ, आणि लव्हली प्रोफेशनल युनिर्व्हसिटी फगवाडा पंजाब यांच्यामधील सांस्कृतिक आदान प्रदान उपक्रमामध्ये शिवाजी विद्यापीठ संघातून कु. आरती हरीभाउ सोमोसे बी.कॉम. भाग–2 व श्री स्वप्नील रमेश कोकळे बीसीए भाग–1 या विद्यार्थ्याची निवड होवून दिनांक 07.04.2022 ते 17.04.2022 रोजी शिवाजी विद्यापीठ संघातून सहभाग नोंदविला आहे.

10. महाविद्यालयातील प्लेसमेंट सेल अंतर्गत खालील विद्यार्थ्याना प्लेसमेंट मिळाली आहे.
    1. 1.श्री. ऋषीकेश अशोक साळुंखे बी.सी.एस–3 या विद्यार्थ्याचे TEC Poll Pune या कपंनीमध्ये निवड झाली आहे
    2. श्री. सोनम धोंडीराम पाटील बी.सी.एस–3 या विद्यार्थ्याचे TCS Pune या कपंनीमध्ये निवड झाली आहे.
    3. श्री. अदित्य प्रकाश संकपाळ बी.सी.ए–3 या विद्यार्थ्याचे TCS Pune या कपंनीमध्ये निवड झाली आहे.
    4. श्री. संग्राम धनाजी पवार बी.सी.एस–3 या विद्यार्थ्याचे Infosys या कपंनीमध्ये निवड झाली आहे.
    5. श्री. प्रतिक भगवान बारगीर बी.सी.एस–3 या विद्यार्थ्याचे TCS Pune या कपंनीमध्ये निवड झाली आहे.
    6. कु. स्मिता अनिल कुंभार बी.सी.ए.–3 या विद्यार्थ्याचे ATOS Pune या कपंनीमध्ये निवड झाली आहे.

11. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत प्रतिवर्षी घेण्यात येणा–या अविष्कार संशोधन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये पलूस शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पलूस या महाविद्यालयाने विविध प्रकारामध्ये सर्वाधिक यश संपादन केले आहे.
    a. <u>Agriculture and Animal Husbandry या प्रकारामध्ये</u>
        1. श्री. पाटील सौरभ दत्तात्रय बीबीए–1 या विद्यार्थ्याने तयार केलेल्या "फवारणी यंत्रास" प्रथम क्रमांक 2.कु. वडार अमिषा सुरेश बीएस्सी भाग–3 या विद्यार्थीनीने या "Cost Effective Organic Amino Acid for crop plants" प्रोजेक्टला द्वितीय क्रमांक मिळाला आहे.
    b. <u>Humanities, Language, Fine Arts या प्रकारामध्ये</u>
    1. कु. काळे ज्योती चंद्रकांत बी एस्सी भाग– 2या विद्यार्थीनीन केलेल्या "Vocal for local" या प्रोजेक्ट करिता तिसरा क्रमांक मिळाला आहे.
    c. <u>Commerce, Management Law या प्रकारामध्ये</u>
    1. श्री. कोळी अभिजित अर्जुन बी ए भाग– 2 या विद्यार्थीनीने केलेल्या "आर्थिक समावेशनात सूक्ष्म वित्तिय संस्थाची भूमिका" या प्रोजेक्ट करिता द्वितीय क्रमांक
    2. पाटील सुप्रिया प्रकाश बी ए भाग– 2 या विद्यार्थीनीने "वास्तव वेतन व पेशातील वेतन" या प्रोजेक्ट करिता तृतीय क्रमांक मिळाला आहे.

12. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत सन 2021–22 या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठ स्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये सांगली विभागीय स्पर्धेतील पाच प्रकारामध्ये गुणानुक्रमे प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या स्पर्धकांनाच शिवाजी **विद्यापीठ स्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेत** सहभाग देण्यात आला होता. त्यामधील Agriculture and Animal Husbandry या प्रकारामध्ये श्री. पाटील सौरभ दत्तात्रय बीबीए भाग– 1 या विद्यार्थ्याने तयार केलेल्या "फवारणी यंत्रास" **द्वितीय क्रमांक** मिळाला आहे. व त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

13. शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्यावतीने झालेल्या राष्ट्रीय कथाकथन स्पर्धेत कु. विनया संकपाळ बीसीए भाग–2 या विद्यार्थीनीस तृतीय क्रमांक मिळाला आहे.

14. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सॉप्टबॉल महिला संघामध्ये आपले महाविद्यालयातील खालील खेळांडूची निवड होवून सोनिपत येथील स्पर्धेत सहभाग घेतला आहे.
    a. कु. पाटोळे स्नेहल विजय बीएस्सी भाग– 3
    b. कु. पाटील मैथिली राजेंद्र बीएस्सी भाग–3
    c. कु. सावंत सायली नितीन बीएस्सी भाग– 3

15. महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाअंतर्गत दिनांक 5 मे 2022 रोजी एकदिवशीय आंतरविद्याशाखीय "समकालीन साहित्यातील बहूसांस्कृतीकता" या विषयावर आंतरराष्ट्रीय ऑनलाईन परिषद घेण्यात आली आहे. याकरिता ढाका बांगलादेश येथील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प्रा.डॉ.इलहम हुसेन, शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. तृप्ती करेकटटी, बनारस हिंदू विद्यापीठाचे डॉ. नामदेव गपाटे यांनी मार्गदर्शन केले. या संमेलनासाठी देशभरातील व पददेशातील एकूण 100 संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. तसेच या संमेलनामध्ये वाचण्यात आलेले शोध निबंध आंतरराष्ट्रीय मासिकामध्ये प्रकाशित करण्यात येतील.

16. प्राणीशास्त्र विभागाअंतर्गत दिनांक 10 मार्च 2022 रोजी Recent advances in Developmental and Reproductive Biology या विषयावार राष्ट्रीय परिषद घेण्यात आली आहे. 142 अभ्यागतांनी सहभाग नोदविला होता. या परिषदेकरिता प्रो. डॉ. सी.बी. गणेश, विभाग प्रमुख, प्राणीशास्त्र कर्नाटक विद्यापीठ कर्नाटक, प्रो. डॉ. एन. अे. ग्रामपुरेहित प्राणीशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ पुणे, डॉ. एस.एम.घासकडबी, आघरकर इन्सिटयूट पुणे हे प्रमुख मार्गदशक उपस्थित होते.

17. माजी विद्यार्थी संघटनेमार्फत – उपक्रम – 60 उसतोड मजूरांच्या कुटुबांमधील मुलांना ड्रेस, खाउ, धान्य वाटप करण्यात आले आहे.

**<u>विद्यापीठ परीक्षा –</u>**

शिवाजी विद्यापीठामार्फत ऑक्टोंबर / नोव्हेबर 2021 मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षा या ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आलेल्या आहेत. तसचे मार्च / एप्रिल 2022 मध्ये होणा–या परीक्षा या ऑफलाईन पध्दतीने होणार असून त्यांची तयारी सुरू आहे.

**<u>ग्रंथालय –</u>**

महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये आज अखेर 21160 ग्रंथ संख्या आहे. त्याच प्रमाणे या वर्षामध्ये 33 नियतकालिकांची वर्गणी 40435/–रू. इतकी पाठविण्यात आली. तसेच रू. 89081/– इतक्या रकमेची पुस्तके खरेदी करण्यात आली आहेत.

<u>मुक्तद्वार पध्दत</u> – विद्यार्थ्यांना आपणास हवे असणारे पुस्तक स्वतः पाहून घेण्यासाठी ग्रंथालयात मुक्तद्वार पध्दत वापरली जाते. विद्यार्थ्यांना चालू घडामोडी समजण्यासाठी ग्रंथालयामध्ये वर्तमानपत्रे घेतली जातात. ग्रंथालयासाठी स्वतंत्र नविन इमारत आहे. ग्रंथालयामध्ये प्राध्यापक व विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करण्यात आलेली आहे.

<u>ग्रंथालय दिन</u>–दि.9/8/2021 रोजी ग्रंथालयाचे जनक डॉ. एस.आर.रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन मा.प्राचार्य, डॉ. आर. एस .साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले तेंव्हा संस्थेचे सदस्य मा. श्री . जयंतराव कदम, प्रा. श्री. एस.टी. पाटील, प्रा. घाडगे ए.बी., प्रा. श्री. हनुमंते , प्रा. सौ. एस. पी. वाघ, प्रा. श्रीमती. चौगुले व्ही.एस., प्रा.कु. सायली पाटील श्री धनाजी पाटील श्री. चंद्रकांत पाटील व ग्रंथपाल श्री. एस.डी.माने. उपस्थित होते.

<u>वाचन कट्टा</u> –विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून दि. 15 ऑक्टोंबर 2021 रोजी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन कट्टा घेण्यात आला.त्या वेळी डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुणे लेखक श्री.सिराज करीम शिकलगार, यांच्या हस्ते करण्यात आले तेंव्हा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एस. साळुंखे, प्रा. श्री.एस.एच.काळे, प्रा.डॉ. एस.एम.कांबळे, प्रा. श्री. भाट डी.व्ही.प्रा.सौ.संगिता एस.पाटील तसेच महाविद्यालयामधील प्राध्यापक उपस्थित होते.

<u>महाविद्यालयास भेट</u>– बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी येथील महाविद्यालयाच्या ग्रंथालयास दि.8/12/2021 रोजी भेट देण्यात आली त्यावेळी बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी कॉलजचे प्राचार्य, मा. डॉ. डी. जी. देशपांडे सर यांना एम.ओ.यु. बाबतचे पत्र आपल्या महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. एस.डी.माने, यांच्या हस्ते देण्यात आले. त्या वेळी भिलवडी कॉलेजचे ग्रंथपाल डॉ. विकास वसंत खराडे, व प्राध्यापक दत्तात्र्य पांडूरंग खराडे व आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जाधव ऋतुजा श्रीनिवास,.कदम श्रुष्टी निरंजन, .यादव नेहा शामराव व. यादव माधुरी अरविंद हे उपस्थित होते.

आपल्या महाविद्यालयाचे इंग्रजी विभागाचे विभाग प्रमुख डॉ.पी.एम. पाटील सरांनी 'इमेज ऑफ गांधी' हे पुस्तक लिहिले त्या पुस्तकांच्या प्रती मा. प्राचार्य डॉ. आर.एस. साळुंख सर यांच्या हस्ते गंथालयास भेट देण्यात आल्या.

ग्रंथ प्रदर्शन – Mathathetics Exhibition निमित्त ग्रंथप्रदर्शन ठेवण्यात आले त्या वेळी मा. प्राचार्य डॉ. आर.एस.साळुंखे, डॉ. सत्यवान पाटील, प्रा. श्रीमती व्ही.एस.चौगुले, प्रा.कु. शिवानी गावडे व ग्रंथपाल श्री एस.डी.माने व विद्यार्थी उपस्थित होते. दि. 27/2/20200 मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ग्रंथालयामध्ये ग्रंथप्रदर्शन घेण्यात आले. प्राध्यापकांना प्रत्यक्ष ग्रंथ पाहून खरेदी करण्यासाठी बेस्ट बुक सेलर्स, कोल्हापूर यांचे ग्रंथ प्रदर्शन दि.15/3/2022 रोजी आयोजित करण्यात आले.

पुस्तक प्रकाशन – महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य यांचे व्यवस्थापन शास्त्राचे मानकरी या पुस्तकाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डी.टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, प्र.कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे झाले.

## जिमखाना

सन 2021–22 या शैक्षणिक वर्षात विविध खेळ प्रकारात खेळाडूंनी भरघोष यश मिळविले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा स्पर्धा कोविड–19 चे शासन निर्णय युजीसी ऐआययु बोर्ड व शिवाजी विद्यापीठ यांचे दक्षतेचे आदेश व नियमानुसार घेण्यात आल्या आहेत.

प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीही खेळ / स्पर्धा मध्ये आपल्या खेळाडूंनी भाग घेतला. सर्व खेळांडूचे परफॉर्मन्स चांगला होता. शिवाजी विद्यापीठ विभागीय व आंतरविभागीय स्पर्धेत 11 कीडा प्रकारात भाग घेवून उज्वल यश मिळवले.

A) AIU – अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खेळाडू व गुणवत्ता– सॉप्टबॉल सोनिपत (हरियाना)

स्पर्धेत खेळाडू व यश

1.श्री पाटोळे स्नेहल विजय – बी.एस्सी.भाग – 3 – कास्यपदक

2.कु.सावंत सायली नितीन – बी.एस्सी भाग–3 – कास्यपदक

3.कु. पाटील मैथिली राजाराम – बी.एस्सी भाग–3 – कास्यपदक

B) AIU – अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खेळाडू व गुणवत्ता– बेसबॉल सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे बारामती स्पर्धेत खेळाडू व यश

1.कु.चौगुले सुमित राजकुमार – बी.एस्सी.भाग– 3 सहभाग

2.श्री गायकवाड ऋतूराज उदय – बी.एस्सी भाग–3 – सहभाग

C) श्री साळुंखे रोहित सतिश – बी.एस्सी.भाग–1 – व्हालीबॉल – महाराष्ट् राज्य अजिक्यपद स्पर्धा कोल्हापूर विभाग संघ उपविजयी तसेच राष्ट्रीय अजिक्यपद स्पर्धा– वर्धमान पश्चिम बंगाल येथे खेळाडूनी सहभाग. घेतला आहे.

शिवाजी विद्यापीठ सांगली विभागीय स्पर्धेतील यश

कुस्ती – 1. श्री पाटील अक्षय रमेश – बी.ए. भाग– 1 तृतीय कमाक

2.श्री पाटील वैभव श्रीकांत –बी.कॉम.भाग–3 द्वितीय कमांक

3.श्री संकपाळ निखील मनोज – बी.ए.भाग– 2 प्रथम कमाक

व्हालीबॉल – पुरूष संघ – विभागीय स्पर्धेत सहभाग व उपविजयी

हॅण्डबॉल – पुरूष संघ – विभागीय स्पर्धेत सहभाग व तृतीय कमांक

बेसबॉल – पुरूष संघ – विभागीय स्पर्धेत सहभाग व विजयी

बेसबॉल – महिला संघ – विभागीय स्पर्धेत सहभाग व विजयी

कबडडी – पुरूष संघ – विभागीय स्पर्धेत सहभाग व चतुर्थ कमांक

बॉक्सीग – पुरूष संघ – माळी सुजीत संजय बी.ए. भाग– 1 प्रथम कमाक

वरील सर्व संघ आंतरविभागीय स्पर्धेत पात्र झरले आहेत.

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धेतील यश

बेसबॉल – पुरूष संघ – विभागीय स्पर्धेत सहभाग व तुतीय कमांक

सॉप्टबॉल – महिला संघ – विभागीय स्पर्धेत सहभाग व तृतीय कमांक

प्रतीवर्षीप्रमाणे महाविद्यालयामध्ये आंतरवर्गीय कीडा स्पर्धा दिनांक 19 एप्रिल 2022 रोजी घेण्यात आल्या आहेत. स्पर्धेचे उदघाटन संस्थेचे अध्यक्ष श्री रामचद्रं पाटील व सदस्य श्री. व्ही. एम. गायकवाड यांचे हस्ते झाले. कबडडी– पुरूष व महिला संघ, लांब उडी, गोळा फेक,धावणे– 200 मीटर पुरूष व महिला खेळाडूनी भाग घेतला आहे. यशस्वी विद्यार्थ्याना गोरविण्यात येणार आहे.

**सांस्कृतिक –**

1. महाविद्यालयामध्ये सांस्कृतिक विभाग कार्यरत असून याअंतर्गत खालीलप्रमाणे उपकम व कार्यक्रम घेण्यात आलेले आहेत.
2. दिनांक 15 ऑगस्ट 2021 रोजी 75 वा स्वातंत्र्यदिन मा. श्री धोंडीराम शिंदे सचिव पलूस शिक्षण प्रसारक मंडळ पलूस यांच्या प्रमुख उपस्थितीत व डॉ. आशाताई पाटील उपाध्यक्षा, पलूस शिक्षण प्रसारक मंडळ पलूस यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.
3. दिनांक 16 ऑक्टोंबर 2021 रोजी राष्ट्पती ए.जी.जे. अब्दूल कलाम जयंती व वाचन प्रेरणादिना निमित्त श्री सिराज शिकलगार आंधळी यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यासाठी व्याख्यान घेण्यात आले आहे.
4. दिनांक 12 नोव्हेबर 2021 रोजी यशवंतराव चव्हाण महाविद्यालय इस्लामपूर येथे आयोजित सांगली जिल्हास्तरीय युवा महोत्सव कार्यशाळेकरिता पाच विद्यार्थी व एक शिक्षक उपस्थित राहिले होते.

5. दिनांक 26 नोव्हेबर 2021 रोजी संविधान दिन निमित्त प्रा. संतोष काळे यांचे व्याख्यान आयोजित करणेत आले होते.
6. दिनांक 22 डिसेबर 2021 रोजी 41 व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवाकरिता 7 विद्यार्थी व 25 विद्यार्थीनी व 4 शिक्षक यांचा सहभाग होता. यामध्ये समूहगीत प्रथम क्रमांक, मराठी वक्तृत्व – तृतीय क्रमांक, सुगम गायन– तृतीय क्रमांक पटकविला आहे.
7. दिनांक 24 डिसेंबर 2021 ग्राहक दिनानिमित्त प्रा.सुनिल जोशी यांचे व्याख्यान आयोजित केले होते.
8. दिनांक 27 डिसेंबर 2021ते 29 डिसेंबर 2021 अखेर संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय महागाव ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर येथे 4 विद्यार्थी व 7 विद्यार्थीनी व 2शिक्षक यांचा सहभाग होता. यामध्ये सुगम गायन या प्रकारामध्ये तृतीय क्रमांक मिळाला आहे.
9. दिनांक 27 डिसेंबर 2021 रोजी महिला स्वसंरक्षण कार्यशाळा घेण्यात आली योवेळी इंडियन मार्शल आर्ट थांग ता असोसिएशन श्री सतिश वडणगेकर यांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले आहे.
10. दिनांक 03 जानेवारी 2022 रोजी सावित्रीबाई फुले जयंती निमित्त सांस्कृतिक विभाग व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने, डॉ. भारती पाटील, कुमठे यांचे व्याख्यान आयोजित केले होते.
11. दिनांक 05 जानेवारी 2022 रोजी ग.दि. माडगूळकर नगरी सांगली येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि राष्ट्रीय कला मंच आयोजित पथनाटय या साहित्य प्रकारात 10 विद्यार्थ्यानी सहभाग घेतला होता. या पथनाटयास तृतीय क्रमांक मिळाला आहे.
12. दिनांक 26 जानेवारी 2022 रोजी 73 वा प्रजासत्ताक दिन सोहळा मा. श्री. पृथ्वीराज देशमुख, माजी आमदार पलूस कडेगाव मतदार संघ यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. श्री रामचंद्र शंकरराव पाटील, अध्यक्ष पलूस शिक्षण प्रसारक मंडळ पलूस यांच्या अध्यक्षतेखाली व संस्थेच्या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.
13. दिनांक 01 फेब्रुवारी 2022 रोजी How to write Research Project या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली यावेळी डॉ.पी.बी. लुपणे व डॉ. पी.बी. गायकवाड यांनी मार्गदर्शन केले
14. दिनांक 27 फेब्रुवारी 2022 रोजी मराठी भाषा संवर्धन दिवस निमित्त पुस्तक प्रदर्शन व हस्ताक्षर स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते.
15. दिनांक 28 फेब्रुवारी 2022 रोजी कै. शंकरराव केशवराव पाटील यांच्या अभिवादन व्याख्यानमालेअंतर्गत श्री.भास्कराव पेरे पाटील, माजी सरपंच पाटोदा यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.
16. दिनांक 28 फेब्रवारी 2022 विज्ञान दिनानिमित्त डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र.कुलसचिव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.
17. दिनांक 08 मार्च 2022 रोजी जागतिक महिला दिनानिमित्त ॲड. नीता रिझरवडकर व सौ. सुमन पाटील यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम व पाककृती स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते.
18. दिनांक 07 मार्च 2022 ते 17 मार्च 2022 या कालावधीत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व लव्हली प्रोफेशनल युनव्हर्सिटी फगवाडा, पंजाब यांचे सांस्कृतिक आदान–प्रदान उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यानी सहभाग नोदविला होता. यामधील कु. आरती हिरभाउ

सोमोसे बी.कॉम.भाग–2 व श्री स्वप्नील रमेश कोकळे बीसीए भाग–1 या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

19. दिनांक 11 एप्रिल 2022 रोजी महात्मा जोतिबा फुले जयंती निमित्त डॉ. एस. वाय शेषभरे यांचे व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.
20. दिनांक 12 मार्च 2022 रोजी यशवंतराव चव्हाण जयंती निमित्त श्री डी व्ही भाट यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.
21. दिनांक 15 मार्च 2022 रोजी Consumer Right Awareness and Investor Awareness या विषयावर Consumer guidene Society of India Mumbai करिता मिलान मेस्त्री व सौ. भक्ती यांचे मार्गदशनपर व्याख्यान, पुस्तक प्रकाशन व MOU करण्यात आलेला आहे
22. दिनांक 17 मार्च 2022 रोजी Entrepreneurship Awareness Programme घेण्यात आलेला आहे
23. दिनांक 29 मार्च 2022 रोजी कै. शंकरराव केशवराव पाटील यांच्या अभिवादन व्याख्यानमालेअंतर्गत डॉ. सुरज चौगुले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते
24. दिनांक 05 एप्रिल 2022 रोजी प्राचार्य डॉ. वाली, आण्णासाहेब डांगे फार्मसी कॉलेज आष्टा यांची महाविद्यालयास सदिच्छा भेट.
25. दिनांक 7 ते 14 एप्रिल 2022 या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताह साजरा करण्यात आला. याअंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आधारीत व्याख्यान, वक्तृत्व व निबंध स्पर्धा घेण्यात आली.
26. दिनांक 09 एप्रिल 2022 रोजी व्यावसायिक अभ्यासक्रमाअंतर्गत पीपीएल चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाकरिता मा. विनोद भटट असोसिएट व्हाईस प्रसिडेन्ट व मा. दोनवडे एचआरहेड किलोस्कर ब्रदर्स लिमिटेड किर्लोस्कवाडी हे प्रमुख उपस्थित होते.
27. दिनांक 18 एप्रिल 2022 रोजी कंपनी सेक्रेटरी कोर्सकरिता ओरिएन्टेशन प्रोग्रॅम घेण्यात आला योवेळी सीएस प्रदिप रासनकर सांगली यांनी मार्गदर्शन केले.
28. दिनांक 19 एप्रिल 2022 रोजी आंतरवर्गीय क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या आहेत

29. दिनांक 23 एप्रिल 2022 रोजी अग्रणी महाविद्यालयाअंतर्गत किल्ले संवर्धन या विषयावर डॉ. सचिन कोंडेकर, प्राचार्य इंदिरा गांधी बी.एड कॉलेज याचे मार्गदर्शन झाले.
30. दिनांक 24 मार्च 2022 रोजी कै. शंकरराव केशवराव पाटील यांच्या अभिवादन व्याख्यानमालेअंतर्गत डॉ. दिनेश कामत यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते
31. दिनांक 25 मार्च 2022 रोजी आझादी का अमृतमहोत्सव अंतर्गत स्वातंत्र्यसैनिक कॅप्टन रामभाउ लाड यांचे कार्य या विषयावर अॅड. दिपक लाड यांचे व्याख्यान झाले.
32. दिनांक 26 एप्रिल 2022 रोजी इंग्रजी विभागाअंतर्गत फिल्म फेसिटेव्हल घेण्यात आला आहे. तसेच विल्यम सेक्सपिअर यांच्या पुस्तकाचे ग्रंथ प्रदर्शन ही घेण्यात आले आहे.
33. दिनांक 29 एप्रिल 2022 रोजी अग्रणी महाविद्यालय अंतर्गत महिला स्वसंरक्षण या विषयावर श्री वडणगेकरण कोल्हापूर यांचे प्रमुख उपस्तीत कार्यशाळा
34. दिनांक 1 मे 2022 रोजी महाराष्ट् दिनानिमित्त संयुक्त झेंडावंदन कार्यक्रम श्री सागर नलवडे, उदयोजक पलूस यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला आहे.
35. दिनांक 2 मे 2022 ते 3 मे 2022 अखेर पलूस शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व संकुलाचा प्रवेशात्सव संपन्न झाला यां अतर्गत परिसरामधील 36 गावामधी विद्यार्थ्याच्या घरी जावून संस्थेतील विविध शाखामधील माहिती देण्याता आली तसेच विद्यार्थ्याना प्रवेशासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले आहे.
36. दिनांक 05 मे 2022 ते 7 मे 2022 अखेर बहाई अॅकेडमी, पाचगणी येथे शिवाजी विद्यापीठ स्तरीय नेतृत्व विकास शिबीराकरिता कृ. भार्गवी विजय कुंभार हिची निवड झाली आहे,
37. दिनांक 5 मे 2022 रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दीनिमित्त कृतज्ञता पर्व कार्यक्रमांअंतर्गत डॉ. रणधीर शिंदे मराठी विभाग प्रमुख शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

**<u>राष्ट्रीय सेवा योजना</u>**

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्याचे मन,मनगट व मेंदू कार्यक्षम होण्यासाठी व राष्ट्रीय दृष्टी निर्माण होण्यासाठी स्वच्छ आणि स्वास्थ भारत निर्माण करण्यासाठी श्रमसंस्काराच्या माध्यमातून मुल्यशिक्षण व व्यक्तीमत्व विकास करण्यासाठी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना 1995–96 पासून सुरू करण्यात आली. सध्या या योजनेत 200 विद्यार्थी कार्यरत आहेत.

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत अंतर्गत खालील उपक्रम राबविण्यात आले आहेत,

a. दिनांक 21 जून 2021 रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.
b. दिनांक 24 सप्टेंबर 2021 रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला आहे.
c. दिनांक 30 ऑक्टोंबर 2021 रोजी सरदार वल्लभाई पटेल जयंती व इंदिरा गांधी पुण्यस्मरण दिनानिमित्त एकता दिन, एकता शपथ व एकता दौड घेण्यात आली
d. दिनांक 30 नोव्हेबर 2021 रोजी मतदान दिनानिमित्त व्याखान, रांगोळी स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या आहेत.
e. दिनांक 19 फेब्रुवारी 2022 रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्तयेथे 44 स्वंयसेवक व 9 शिक्षक व प्रशासकीय सेवक यांच्या सहभागातून किल्ले मच्छिंद्रगड येथे स्चच्छता मोहिम राबविण्यात आली आहे.
f. दिनांक 19 मे 2022 रोजी श्री शिवाजी नेर्ली बेळगाव कर्नाटक यांचे मानवी मुल्ये व व्यक्तीमत्व विकास या विषयावर व्याख्यान घेण्यात आले आहे.

विशेष श्रमसंस्कार शिबीर – महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत निवासी विशेष श्रमसंस्कार शिबीर दत्तक खेडे– सावंतपूर येथे दिनांक 24 मार्च 2022 ते 30 मार्च 2022 अखेर घेण्यात आले. यामध्ये 100 स्वंयसेवकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये श्रमदान, विद्यार्थी परिसंवाद, प्रबोधन, तज्ञाची व्याख्याने, प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबीर, महिला मेळावा, पथ नाटय, रस्ता सुरक्षा, प्रबोधन रॅली, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रम घेण्यात आले आहेत.

एन.सी.सी.

**महाविद्यालयामध्ये एन.सी.सी. युनिट कार्यरत असून ते १६ महा. बटालियन सांगली यांचेशी सलग्न आहे. सन. २०२१-२२ मध्ये महाविद्यालयातील ३६ विध्यार्थी व १६ विध्यार्थिनी असे एकूण ५२ कॅडेट एन.सी.सी. मध्ये प्रवेशित आहेत. सन २०२०-२१ मधील 'बी' सर्टिफिकेट परीक्षेचा निकाल ५२.९४ % तसेच 'सी' सर्टिफिकेट परीक्षेचा निकाल ५७.८९ % आहे.**

**विविध कॅम्पसाठी निवड व सहभाग:**

**अ) दि. ०१/०९/२१ ते १०/०९/२१ या कालावधी मध्ये पुणे येथे झालेल्या** SHOOTING CAMP' **साठी महाविध्यालयातील ०१ विध्यार्थिनीची निवड व सहभाग.**

**ब) दि. २६/11/२१ ते ०५/१२/२१ या कालावधी मध्ये बांबवडे (शाहुवाडी) या ठिकाणी झालेल्या** 'CATC-STT' **या कॅम्प साठी महाविद्यालयातील ०५ विध्यार्थी सहभागी झाले होते.**

**क) दि. ०३/०१/२२ ते ०७/०१/२२ या कालावधी मध्ये सांगली येथे झालेल्या** 'CATC' **या कॅम्प साठी महाविद्यालयातील ०८ विध्यार्थी व ०६ विध्यार्थिनीची निवड व सहभाग.**

**ड) दि. ०३/०१/२२ ते ०७/०१/२२ या कालावधी मध्ये सांगली येथे झालेल्या** 'CATC' **या कॅम्प साठी महाविद्यालयातील ०३ विध्यार्थी व ०४ विध्यार्थिनीची निवड व सहभाग.**

**इ) दि. ०४/०४/२२ ते १८/०४/२२ या कालावधी मध्ये नाशिक येथे झालेल्या** 'ARMY ATTACHMENT CAMP' **या कॅम्पसाठी महाविद्यालयातील ०१ विध्यार्थ्याची निवड व सहभाग.**

**४. आझादी का अमृत महोत्सव** :

**दि. 11/०९/२१ रोजी महाविद्यालयाच्या क्रीडांगनावर 'आझादी का अमृत महोत्सव' या योजने अंतर्गत** 'FIT INDIA FREEDOM RUN-2.0' **हा उपक्रम आयोजित केला होता. सदर उपक्रमामध्ये महाविद्यालयातील व हायस्कूल मधील सर्व एन.सी.सी. कॅडेट सहभागी झाले होते.**

**५. स्वच्छता अभियान:**

**दि. १७/१२/२१ रोजी एन.सी.सी. विभागामार्फत महाविद्यालय परिसरामध्ये 'स्वच्छता अभियान' राबविण्यात आले.**

<u>अग्रणी महाविद्यालय व विद्यार्थी विकास</u>

दिनांक 25 मार्च 2022 रोजी विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कार्यशाळा संपन्न झाली. यामध्ये अग्रणी महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती संबंधी मार्गदर्शन, स्त्री संरक्षण व किल्ले व्यवस्थापन या विषयावर कार्यशाळेचे आयोजन, अग्रणी महाविद्यालयामध्ये आयोजित विविध कार्यक्रमांना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उपस्थिती नोदविली आहे.

<u>नॅक</u>

महाविद्यालयाचे नॅक संस्थेकडून 02 नोव्हेंबर 2018 रोजी पुर्नमूल्यांकन झालेले आहे. त्यामध्ये महाविद्यालयास बी. ही ग्रेड मिळालेली आहे. त्यानंतर प्रत्येक वषामधील अहवाल अेक्यूआर नॅक संस्थेकडे सर्व पूर्ततेसह ऑनलाईन सादर करण्यात आलेला आहे. व नॅक मूल्यांकनासंबधी सर्व पूर्तता या शैक्षणिक वर्षाअखेर पूर्ण केलेली आहे.

<u>महिला वसतीगृह</u> –

महाविद्यालयामध्ये महिला वसतीगृहाची सोय करण्यात आली असून यामध्ये पदवी व पदव्युत्तर वर्गाची विद्यार्थीनीची सोय करण्यात आली आहे.

## <u>समारोप</u>

ग्रामीण भागातील आपल्या या महाविद्यालयाचा उत्कर्ष होण्यासाठी या परिसरातील हितचिंतक, त्याचप्रमाणे माजी विद्यार्थी, विविध संस्था यांनी गुणी विद्यार्थ्यांच्यासाठी रोख बक्षीसे ठेवली आहेत अशा दानशूर व्यक्ती व प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या महाविद्यालयास सहकार्य करणा—या संस्था व व्यक्तीचे सहकार्य मिळत असते. खास बाब म्हणून मी नमूद करू इच्छितो की, पलूस शिक्षण प्रसारक मंडळाचे मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सर्व संचालक व सदस्य तसेच लक्ष्मणराव किर्लोस्कर विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक, उपप्राचार्य, टेक्नीकल विभागप्रमुख , सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन मिळत असते. या सर्वाचा व ज्ञात, अज्ञात सर्व हितचिंतकांचे आम्ही आभारी व सदैव ऋणी आहोत.

यापूढेही सर्वाचा कृपालाभ वृध्दीगंत व्हावा अशी इच्छा व्यक्त करून अहवाल पूर्ण करीत आहे.

जयहिंद जय महाराष्ट्!

दिनांक : 02 जून 2022
ठिकाण : पलूस

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE PALUS 416 310

Principal,
Arts, Commerce and Science College, Palus
Principal
Arts,Commerce & Science College
Palus,Dist.Sangli